आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२० जानेवारी २०२६ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- १२ जिल्हा परिषद आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी अर्ज भरायचा उद्या शेवटचा दिवस

- भाजपाचे १२ वे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नितिन नोबीन यांनी स्वीकारला पदभार

- तमिळनाडू विधीमंडळाच्या अधिवेशनात सलग चौथ्यांदा अभिभाषण न वाचताच राज्यपाल परतले

- सोनं दीड लाखाच्या तर चांदी ३ लाखांच्या पलीकडे, सेन्सेक्समध्ये एक हजार अंकांची घसरण

**आणि**

- पाकिस्तानात कराचीमध्ये मॉलमध्ये लागलेल्या आगीत २८ जणांचा मृत्यू, ८० जण बेपत्ता

<><><><><>

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत उद्या संपणार आहे. १६ जानेवारीला अर्ज भरायला सुरुवात झाली होती. २२ जानेवारीला अर्जांची छाननी होईल आणि २७ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील.  याच दिवशी अंतिम उमेदवार यादी जाहीर होईल आणि मतदान चिन्ह वाटप होईल. ३ तारखेला मध्यरात्रीपर्यंत उमेदवारांना प्रचार करता येईल आणि ५ फेब्रुवारीला सकाळी साडे ७ ते साडे ५ दरम्यान मतदान होईल. प्रत्येक मतदाराला जिल्हा परिषदेसाठी १ आणि पंचायत समितीच्या गणासाठी एक अशी दोन मतं द्यावी लागतील.

<><><><><>

लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याअंतर्गत केंद्र सरकारी कर्मचारी किंवा अधिकाऱ्याविरुद्ध कारवाई करण्यासाठी पोलिसांना सीबीआयकडून पूर्वपरवानगी घेण्याची आवश्यकता नाही असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. केवळ कारवाईच्या सुलभतेसाठी वेगवेगळ्या केंद्रीय आणि राज्यस्तरीय यंत्रणा वेगळ्या स्तरावर काम करत

असतात, मात्र राज्यस्तरीय यंत्रणांना केंद्र सरकारी अधिकाऱ्याची चौकशी करता येईल आणि आरोपपत्रही दाखल करता येईल, असा निर्णय राजस्थान उच्च न्यायालयाने एका प्रकरणात दिला होता, तो सर्वोच्च न्यायालयानं कायम ठेवला आहे.

<><><><><>

समाजात द्वेष निर्माण करणारी भाषणं आणि त्याचे परिणाम रोखण्यात कायद्याच्या यंत्रणांना अपयश येत असल्याबाबत दाखल झालेल्या याचिकेवरचा निकाल आज सर्वोच्च न्यायालयाने राखून ठेवला. उत्तर प्रदेशात नॉयडा इथं एका मुस्लिम धर्मगुरुविरोधात झालेल्या अपराधांबाबत न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या पीठासमोर सुनावणी सुरु आहे. भडकाऊ भाषणांमुळे हिंसा होते आणि सरकारी यंत्रणा ती रोखत नाहीत असं याचिकाकर्त्याचं म्हणणं आहे. याचिकेवर सविस्तर सुनावणी घेऊ असं सांगून न्यायालयानं सर्व पक्षांना लेखी निवेदन द्यायला सांगितलं.

<><><><><>

कायद्याच्या पदवी अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षातल्या विद्यार्थ्यांना अखिल भारतीय स्तरावरची बार कौन्सिलची परिक्षा वर्षातून दोन वेळा देता येईल अशा तऱ्हेने नियम बदलले आहेत अशी माहिती आज भारतीय बार कौन्सिलने सर्वोच्च न्यायालयाला दिली. कायद्याच्या अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षातल्या विद्यार्थ्यांना ही परीक्षा द्यायला विरोध करणारे नोटीफिकेशन बार कौन्सिलने जारी केले होते. त्या विरोधात नऊ विद्य़ार्थी आणि काही वकिलांनी याचिका केली होती.

<><><><><>

भारतीय जनता पक्षाचे बारावे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नितीन नबीन यांच्या नावाची औपचारिक घोषणा आज नवी दिल्लीच्या भाजपा मुख्यालयात पक्षाचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. के लक्ष्मण यांनी केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नबीन यांचा सत्कार करण्यात आला. केंद्रीय मंत्री अमित शहा, राजनाथ सिंह, नितीन गडकरी, माजी अध्यक्ष जे.पी नड्डा यावेळी उपस्थित होते. नितीन नबीन हे भाजपाचे आतापर्यंतचे सर्वात तरुण अध्यक्ष ठरले आहेत. जगातल्या सर्वात मोठ्या राजकीय पक्षाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी नितीन नबीन यांचं

अभिनंदन केलं. नितीन नबीन यांच्यावर केवळ पक्षाचीच नाही तर रालोआमधे समन्वय साधण्याची जबाबदारी आहे, असं मोदी म्हणाले.

**- - होल्ड बाईट मोदी - - -**

**- <><><><><>**

तमिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी आज अभिभाषण न वाचताच विधानसभेतून बाहेर पडले. छापील भाषण वाचण्याचा आग्रह विधानसभा अध्यक्ष एम. अप्पावु यांनी केल्यामुळं राज्यपाल भाषण पूर्ण न वाचताच बाहेर पडले. २०२३ पासून सलग चौथ्यांदा त्यांनी अभिभाषणाचं वाचन केलेलं नाही.

अभिभाषण सुरू होण्याच्या आधी राष्ट्रगीत वाजवलं जावं असा राज्यपालांचा आग्रह होता. तर प्रथेप्रमाणे अभिभाषणाच्या आधी राज्य गीत आणि भाषण संपल्यावर राष्ट्रगीत यावर सरकार ठाम होतं. सभागृहात राष्ट्रगीताचा अपमान झाला, राज्यपालांचा माइक बंद करण्यात आला आणि लोकांच्या अनेक समस्यांकडे या भाषणात सरकारनं दुर्लक्ष केल्याचं निवेदन तमिळनाडूच्या लोकभवनाकडून प्रसिद्ध करण्यात आलं. सरकारनं हे सर्व मुद्दे फेटाळून लावले आहेत. समविचारी पक्षांच्या मदतीने घटनादुरुस्ती करुन राज्यपालांच्या अभिभाषणाची ही पद्धत बंद करण्याची मागणी संसदेत करणार असल्याचं तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन म्हणाले.

**<><><><><>**

मुंबईच्या सराफा बाजारात आज सोन्याचे दर तोळ्यामागे करांसह दीड लाख रुपयांच्या पलीकडे गेले तर चांदीनं किलोमागे करांशिवाय ३ लाखांचा टप्पा ओलांडला.

सोनं आज तोळ्यामागे सुमारे ३ हजार ४०० रुपयांनी महाग झाल्यानं एक तोळा २४ कॅरेट सोन्याच्या किंमत १ लाख ५१ हजार ८०० रुपयांच्या पलीकडे गेली. २२ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ४८ हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम मोजावी लागत होते. दिवसभरात चांदी किलोमागे १५ हजार ३७० रुपयांनी महाग झाली आणि करांसह एक किलो चांदीसाठी ३ लाख १८ हजार ६२५ रुपये मोजावे लागत होते.

**<><><><><>**

अमेरिकेकडून वारंवार दिली जाणारी आयात शुल्क वाढीची भिती, कमकुवत होणारा रुपया यासारख्या कारणांमुळं देशातल्या शेअर बाजारात आज मोठी घसरण झाली.

दिवसअखेर सेन्सेक्स १ हजार ६६ अंकांनी घसरुन ८३ हजारांच्या खाली जाऊन ८२ हजार १८० अंकांवर बंद झाला. व्यवहारा दरम्यान हा निर्देशांक ८२ हजारांच्या पातळीखाली जाण्याचीही भिती निर्माण झाली होती. निफ्टी ३५३ अंकांची घट नोंदवून २५ हजार २३२ अंकांवर स्थिरावला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून प्रगती व्यासपीठामुळं यवतमाळ जिल्ह्यातल्या बेंबळा सिंचन प्रकल्पाला गती मिळाली. याविषयी अधिक जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून......

**<u>व्हीसी</u>**

*(प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत राबवण्यात आलेला यवतमाळ जिल्ह्यातला बेंबळा सिंचन प्रकल्प हा विदर्भातल्या कृषी क्षेत्राला मजबूत करण्याच्या उद्देशाने उभारलेला एक प्रमुख सिंचन प्रकल्प आहे. २ एप्रिल २००७ रोजी २ हजार ६८५ कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या या प्रकल्पाला मंजुरी मिळाली. मात्र हा प्रकल्प पूर्ण होण्यात अनेक अडचणी येत राहिल्या. त्यामुळं २५ ऑक्टोबर २०२३ रोजी प्रधानमंत्र्यांनी प्रगती व्यासपीठाच्या अंतर्गत या प्रकल्पाचा आढावा घेतला. आढाव्यानंतर त्यांनी संबंधित केंद्रीय मंत्रालयं, राज्य सरकार यांना समस्यांचं निराकरण करण्याचे निर्देश दिले. त्या अनुषंगाने भूसंपादन प्रक्रिया जलद करणं, सुधारित नियोजन आणि उर्वरित कालव्याचं काम पूर्ण करण्यात आलं. अखेर गेल्यावर्षी ३० जून रोजी हा प्रकल्प कार्यान्वित झाला.)*

**<><><><><>**

पाकिस्तानमधे कराची इथल्या एका शॉपिंग प्लाझामध्ये आज लागलेल्या आगीत २८ जणांचा मृत्यू झाला असून ८० जण बेपत्ता आहेत. अजूनही बचावकार्य सुरू असल्याचं पोलिसांनी सांगितलं. मृतांपैकी  १८ जणांची ओळख पटली असून इतरांची डीएनए चाचणी करण्यात येत आहे. शॉपिंग प्लाझाच्या तळमजल्यावर लागलेली आग संपूर्ण इमारतीत पसरल्यामुळे ही दुर्घटना झाली.

**<><><><><>**

महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत आज गुजरातमधे वडोदरा इथं दिल्ली कॅपिटल्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात सामना सुरु आहे. दिल्ली कॅपिटल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा मुंबई इंडियन्सच्या ९ षटकात २ बाद ४७ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//